प्रेस नोट दिनांक :- १४/०९/२०२६

# नायट्राझेपाम (अंमली पदार्थ) गोळयांची अवैध विक्री करणाऱ्या दोघांना गुन्हे शाखा,कक्ष-६, मुंबईकडून अटक, १२.८१ किलो वजनाच्या गोळयांसह मुददेमाल जप्त....

दिनांक ०९/०९/२०२६ रोजी कक्ष-६ यांना मिळालेल्या गोपनीय माहीती आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचुन दोन इसमांना पनवेल सायन हायवेच्या बाजूचा दक्षिण वाहीणी सर्व्हिस रोडवर, ट्रॉम्बे वाहतूक कार्यालयाचे पाठीमागील बाजूस, ट्रॉम्बे, मुंबई या ठिकाणी Nitrazepam Tablets **Button** या अंमली पदार्थाच्या २१,००० टॅबलेट्स ज्याचे एकूण वजन १२.८१ किलो ग्रॅम, व एकूण किंमत ६४,०५,०००/- किंमतीचा मुद्देमाल स्वत:चे कब्जात बेकायदेशीर रित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळून आले. दोन्ही आरोपी हे नशेच्या गोळया स्वताच्या कब्जात ग्राहकांना नशेकरीता विक्री करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. अटक आरोपींवर याआधी एन.डी.पी.एस. प्रमाणे गुन्हे दाखल असुन दोन्ही इसमांवर एन.डी.पी. एस. कायदा १९८५ कलम ८ (क), २२(क), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीतांची माहीती-
१) पुरूष वय ४४ वर्षे, रा. ठि. शिवजीनगर, गोवंडी, मुंबई.
२) पुरूष, वय ५० वर्षे, रा.ठी. कौसा, मुंब्रा, जि. ठाणे

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई श्री. देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री अनिल कुंभारे, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. कृष्णकांत उपाध्याय, मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१) श्री. नवनाथ ढवळे , व मा.सहा.पो.आयुक्त (डी पुर्व) धर्मपाल बनसोडे यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष ६ चे प्रभारी पोलीस निरीक्षक भरत घोणे, पो.नि. सुशांत सावंत, म.स.पो.नि चौधरी , म.पोउपनि माशेरे, पोउपनि देसाई, पो.ह.वानखेडे,पो.ह. खेडकर, पो.ह.भालेराव ,पो.शि.पांचाळ, पो.शि. शेख, पो.शि बोढारे, पो.शि.ससाणे, म.पो.शि. खुटवड, पो.ह.चा मगर या पथकाने पार पाडली आहे.